## निशाण क्र.११२ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने दावा मिळकतीमध्ये तोड झालेल्या झाडांची गोलाई, उंची या स्वरूपाची मोजमापे घेवून झाडांचा लिलाव वनपाल देवगड यांचेमार्फत करणेत यावा आणि लिलावातून प्राप्त होणारी रक्कम न्यायालयात जमा करणेत यावी यासाठी दाखल केला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार प्रतिवादीने दावा मिळकतीमधील अनाधिकारे तोडलेली सागाची झाडे दावा प्रलंबित कालावधीमध्ये कोणासही विकू नये, वाहतूक करू नये वगैरे दादींकरिता वादीने नि.क्र.५ ला अर्ज दाखल करून तुर्तातुर्त ताकीद देण्याची विनंती न्यायालयास केली होती. सदर मनाई अर्जाबरोबरच प्रतिवादीने दावा मिळकतीमध्ये तोडून ठेवलेल्या झाडांची लांबी, रूंदी, उंची वगैरेचा तपशील न्यायालयासमोर यावा यासाठी वादीने वकीलांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक करून त्यांना अहवाल सादर करण्याची विनंती केली होती, त्याप्रमाणे कोर्ट कमिशनर यांनी दि.१९/०४/२०१७ इ. रोजी दावा मिळकतीच्या ठिकाणी भेट दिली. परंतु, सदर भेटी वेळी तोड झालेली झाडे जंगलात व झाडी झुडपात असल्यामुळे त्यांना त्यांची मोजमापे घेता येवू शकली नाहीत असा अहवाल न्यायालयासमोर सादर केला आहे. त्यानंतर वनपाल, देवगड यांनी वादी प्रतिवादींनी वाद मिळकतीतील तोड झालेल्या झाडांच्या परिसरातील जंगल व झाडे झुडुपांची साफसफाई करणेबाबत नि.क्र.९७ अन्वये कळविले होते. त्यानुसार वादी याने सदरची साफसफाई केलेली आहे. म्हणजेच वनपाल, देवगड यांना कोर्ट कमिशनकरिता आवश्यक ती पुर्तता केलेली आहे. सदरची तोड झालेली झाडे जाग्यावरच पडून राहिल्यास ती निरूपयोग ठरणारी आहेत. सामाईक मिळकतीतील झाडे तोड झाली असल्यामुळे वादी, प्रतिवादींचे अगोदरच नुकसान झाले आहे. आता ती अशीच फुकट गेल्यास उभय पक्षकारांचे आणखीन नुकसान होणार आहे. सबब, या सर्व कारणास्तव वादीने दावा मिळकतीमध्ये तोड झालेल्या झाडांची गोलाई, उंची या स्वरूपाची

मोजमापे घेवून झाडांचा लिलाव वनपाल देवगड यांचेमार्फत करणेचा आदेश व्हावा आणि सदर लिलावातून प्राप्त होणारी रक्कम न्यायालयात जमा करणेत यावी अशी विनंती केली आहे.

२. प्रतिवादी क्र.१ याने निशाण क्र.११३ ला म्हणणे दाखल केले आहे. त्याच्या म्हणण्यानुसार प्रस्तुतचा अर्ज न्यायसंगत नाही. दावा मिळकतीतील लाकूड सामानाचा लिलाव करण्यास विरोध असून लिलाव झाल्यास प्रतिवादी क्र.१ याचे आर्थिक नुकसान होणार आहे. दावा मिळकतीतील झाडे ही सन १९५९ पुर्वीची आहेत हे वादी यांनी प्रथम सिध्द् करावे व त्यानंतर न्यायालयाकडे लिलावाची मागणी करावी. प्रतिवादी क्र.१ ची आजी कै. गिरजाबाई शंकर राणे ही सन १९५९ पर्यंत तिचे पती कै. शंकर मुकंद राणे यांच्यासोबत समाईक घरात राहत होती, तिचे पती कै. शंकर मुकुंद राणे यांच्या मृत्यु नंतर कै. गिरजाबाई राणे ही सन १९६० मध्ये समाईक घरातून बाहेर पडून ती स्वकष्टाने व स्वत:च्या पैशाने वेगळे घर वेगळया जागेवर बांधून राहू लागली. तिने स्वकष्टाने लागवड केलेल्या झाडांचे तिने गुरांपासून व जंगली प्राण्यांपासून संरक्षण केले आहे. दावा मिळकत विना मोबदला बक्षिसपत्राने दान करण्याचा तिला नैतिक तसेच कायदेशीर अधिकार आहे. तोड झालेल्या दावा मिळकतीत कै. शंकर राणे यांचा काहाही संबंध नाही. सदर दावा मिळकत कै. गिरजाबाई राणे हिने स्वकष्टाने उभी केलेली तिची स्वत:ची मिळकत आहे, त्यामुळे त्या मिळकतीस सामाईक मिळकत असे म्हणता येणार नाही. सन १९७२ रोजी कै. गिरजाबाई शंकर राणे हिने तिच्या स्वत:च्या घरासहीत दावा मिळकत विना मोबदला बक्षिसपत्राने प्रतिवादी क्र. १ याच्या नावे केली आहे आणि याची माहिती कै. गिरजाबाई राणे हिच्या दोन्ही मुलींना आहे. सदर दोन्ही मुलींनी बक्षिसपत्रास तेव्हाही आणि केव्हाही हरकत घेतली नाही. त्यामुळे आता कै.गिरजाबाईच्या मृत्युनंतर सुमारे ३४

वर्षानंतर बक्षिसपत्रास वादी यांनी हरकत घेणे आणि दावा मिळकतीत हक्क सांगणे हे न्याय संगत नाही. सन १९७२ पासून आजपर्यंत दावा मिळकत प्रतिवादी क्र.१ यांच्या कब्जे वहिवाटीस आहे. या सर्व कारणास्तव सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी क्र.१ याने केली आहे.

३. वादी, प्रतिवादी क्र.१ तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला

४. नि.क्र.८० वरील आदेशान्वये वादी याच्या विनंतीनुसार वनपाल, देवगड यांनी दावा मिळकतीतील झाडांची पाहणी करून त्यांची मोजमापे घेवून त्या झाडांची लिलावाद्वारे विक्री करावी व विक्री किंमत न्यायालयात जमा करावी, त्याबाबतचा पंचनामा करावा व तसा अहवाल याकामी सादर करावा असे आदेश देण्यात आले आहेत. परिमंडळ वन अधिकारी, देवगड यांनी नि.क्र.९७ ला असलेल्या अहवालामध्ये व नि.क्र.९८ ला असलेल्या परिमंडळ वन अधिकारी यांच्या पत्रावरून सदर लाकडांभोवती सभोवतालची झाडेझुडपे व गवत साफ करण्यासाठी व मोजमापे घेताना अडथळा होणार नाही याची दक्षता घेण्यासाठी वादी, प्रतिवादी यांस याबाबत कळविले होते असे दिसून येते. त्यानंतर वादी यांनी सदरची साफसफाई केली आहे असे त्यांच्या अर्जामधील कथनावरून दिसून येते. त्यामुळे नि.क्र.८० वर पारित झालेल्या आदेशाप्रमाणे वनपाल देवगड यांनी पुढील कारवाई करावी असे मला वाटते. नि.क्र.८० च्या अर्जावर या तोडलेल्या झाडांच्या पाहणीबाबत व लिलावाबाबत गुणावगुणावर आदेश झाल्यामुळे पुन्हा तशाच प्रकारचे आदेश पारित करण्याची आवश्यकता वाटत नाही. तसेच एकदा तसा आदेश झाला असल्यामुळे व या आदेशास आव्हान दिले नसल्यामुळे सदर आदेशानुसार लिलावास विरोध करता येणार नाही. परिणामी मी खालील आदेश पारित करीत आहे:

नियमित दिवाणी दावा क्र. ६०/२०१६
निशाणी क्र. ११२ वरील आदेश
श्री. बाळकृष्ण सावंत वि. श्री.जयवंत सावंत वगैरे
सी.एन.आर.क्र.—एमएचएसआय०९—०००१९५—२०१६

# आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. नि.क्र.८० वरील आदेशाप्रमाणे पुर्तता करणेस वनपाल देवगड यांना पत्र पाठविण्यात यावे.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/—
( गि.सु.माने )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

देवगड
दिनांक ११/०४/२०१८